# मूर्खांच्या दुनियेत आनंदाचा शोध

श्री श्रीमद् भक्तिवेदांत नारायण गोस्वामी महाराज



Education For Life & Soul

CENTER FOR BHAKTI STUDIES

**Author:** Sri Srimad Bhakti Vedanata Narayan Goswami Maharaj

**Translation and typing by:** Srimati Aparna Sinha dd

**Proof Reading:** BV Vishnu-daivata Maharaj

**Published by:** Bhakti University, LLC, Harrisburg, PA, USA with permission from GVP

**Typeset and Printed by:** Sripad Atul Chandra Goel, Shahdra, Delhi, India

**Cover Photo:** Bangalore, India Gurukul children

**Financial Help:** Srimati Chandramukhi Devi dd, Hawai, USA.

**Contact info:** igvt.hbg@gmail.com

**Websites:** www.bhaktistudies.ning.com, www.purebhakti.com, www.purebhakti.tv

# भाग पहिला

# शुद्ध प्रेम आणि वात्सल्य

## मूळ संदेश

पाश्चिमात्य देशांमध्ये प्रवास करून संदेश देताना मला अतिशय आनंद होतोय. परंतू मी काही नवीन सांगण्यासाठी आलेलो नाही. मी केवळ श्री भक्तिवेदांत स्वामी महाराज यांच्या मार्गावरून चाललो आहे. त्यांनी जो संदेश पाश्चिमात्य देशांमध्ये दिला, तोच पुन्हा सांगण्यासाठी मी आलो आहे. स्वामी महाराज हेच माझे जिवलग सखा आणि मला आदेश देणारे गुरु आहेत. स्वामी महाराजही जगाला काही वेगळं देण्यासाठी आले नव्हते. श्री चैतन्य महाप्रभूंपासून गुरुपरंपरेने मिळालेले ज्ञान, स्वामी महाराजांनी जगाला दिले.

श्री चैतन्य महाप्रभू हेच पूर्ण-पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्ण होत. मात्र आपल्याला निःसीम दिव्य भक्तिमार्ग, शिकविण्यासाठी श्रीकृष्ण स्वतःच आपल्या भक्ताच्या रूपात अवतरले. जेणेकरून जनसामान्य त्यांच्यावर शुद्ध आणि अनन्यभावाने प्रेम करतील.

## आपण या जगात आनंद शोधू शकत नाही

आपण आनंदी व्हावं अशी श्री चैतन्य महाप्रभू आणि या गुरुपरंपरेतील सर्वांचीच इच्छा आहे. मात्र या जगात आपल्याला अतिशय थोडा आनंद आणि प्रेम मिळतं. त्यातही दुःख आणि यातनाच अधिक असतात.

आपल्याकडे इतक्या गोष्टी असूनही आपण आनंदी का नाही याचा विचार आपण केला पाहिजे. नेपोलियन, अमेरिकेचे अध्यक्ष केनडी किंवा प्रिंसेस डायना यांचं उदाहरण घ्या. ते काही रस्त्यावरचे भिकारी नव्हते. प्रिंसेस डायनाकडे नाव, पैसा, सौंदर्य सगळं काही होतं, तिचे लग्न प्रिंस चार्ल्सशी झाले होते; पण ती आनंदी नव्हती.

लोकांकडे ऐश्वर्य, संपत्ती, अधिकार असं सगळं काही असूनही ते आनंदी का नाहीत याचा अतिशय गांभीर्यपूर्वक विचार करण्याची गरज आहे. जर आपण विचार केला नाही तर आपल्यात आणि जनावरांमध्ये काय फरक आहे. तुम्ही मुसोलिनीबद्दल ऐकलं असेल. राजकीय शक्तीमुळे तो अतिशय ताकदवान होता. हिटलर तर त्याहूनही वरचढ होता, मात्र ते दोघे आनंदी नव्हते.

आपण सध्या ज्या पद्धतीने जगतो त्यावर दृष्टिक्षेप टाकून भविष्याचा विचार करा आणि स्वतःला प्रश्न विचारा, 'मी सध्या जे करतोय, ज्या मार्गाने जातोय, त्यामुळे भविष्यात मी आनंदी होईन का?'आपण स्वतःला हा प्रश्न विचारल्यावर असं लक्षात येईल की आपणही त्याच मार्गानं जातोय ज्या मार्गाने हे सगळे गेले. ते सगळे दुःखी होते. त्याच मार्गाने गेलो तर आपणही दुःखी होऊ.

या जगात पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष यांच्यासारखी अनेक अतिशय श्रीमंत मंडळी आहेत. त्यांच्याकडे अधिकार आणि मौजमजेची सगळी साधनं असूनही ती दुःखी आहेत. एक दिवस वृद्धापकाळाने त्यांचं निधन होईल. या जगात त्यांच्याकडे असलेलं सर्वकाही नष्ट होईल.

आपण भौतिक जगात अगदी स्वयंपाकघरापासून ते वैद्यकशास्त्र अशा प्रत्येक क्षेत्रात प्रचंड प्रगती केलीय. विशेषतः संज्ञापन, दळणवळण, परिवहन, औषधे अशा क्षेत्रांमध्ये नवनवीन शोध लावलेत. आपला एखादा अवयव निकामी झाला तर आपण तो बदलू शकतो. एखाद्या मृत व्यक्तीचे डोळे मिळाल्यामुळे अंध माणसाला दृष्टी मिळू शकते. शल्यचिकित्सक हृदयात बिघाड असेल तर नवीन हृदय बसवू शकतात. मात्र एवढ्या प्रगतीनंतरही, आम्हाला वृद्ध होऊन मृत्यूला सामोरे जावेच लागेल.

भौतिक प्रगतीच्या बाबतीत अमेरिका सर्वात आघाडीवर आहे. पण अमेरिकी लोक आनंदी आहेत का? जर ते आनंदी आहेत तर ते एकमेकांशी भांडाभांडी का करताहेत? आत्महत्या करणाऱ्यांची संख्या इतकी मोठी का आहे?

यातून हेच दिसून येतं की केवळ भौतिक प्रगतीमुळे आपण आनंदी होऊ शकत नाही.

**वृद्धावस्था आमच्याशी जबरदस्तीने लग्न करेल**

आपल्या म्हातारं व्हायचं नसतं, आपले केस पांढरे होऊ नयेत असंच आपल्याला वाटतं. आपली दृष्टी कमजोर होऊ नये, आपण आंधळे होऊ नये असं आपल्याला वाटतं. आपल्याला चिरंतन तरुण आणि सुंदर राहावंस वाटतं. मात्र एक दिवस आपण म्हातारे होऊच. सर्वसाधारणपणे, जी स्त्री वृद्ध आणि कुरूप आहे तिच्याशी पुरुषाला विवाह करायचा नसतो. वृद्ध होणं म्हणजे कुरूप होणं, मग अशा व्यक्तीशी कोण विवाह करणार?

कुणालाही म्हातारपण नको असतं. मात्र ते येतंच. त्यामुळे तुमचे दात पडतील, तुम्हाला कवळी बसवावी लागेल. आपण आपले पांढरे केस रंगवून काळे करू शकू, दातही सुंदर करू शकू, मात्र चेहऱ्यावर सुरकुत्या येणारच. तुम्हाला "वृद्धावस्थेशी" लग्न करावे लागेल आणि म्हातारे व्हावं लागेल. म्हातारपणी कदाचित तुम्हाला चालताही येणार नाही.

शेवटी मृत्यूनंतर अनेकजण तुम्हाला खांदा द्यायला येतील. दफनभूमी किंवा स्मशानात नेलं जाईल. स्मशानभूमीत नेलं तर अग्नी दिल्यानंतर तुमच्या मृतदेहाची राख होईल. दफन केलं तर मृतदेहाचा काही भाग कीटक आणि कृमी खातील तर उरलेल्या भागाचं विघटन होईल. जर मृतदेह तसाच टाकला गेला तर कुत्री, कोल्हे, रानटी डुक्कर त्यावरून भांडतील. "अरे, तो मासाचा तुकडा माझा आहे. तू कशाला घेतलास?" सरते शेवटी शरीराचं विष्ठेत रुपांतर होईल.

ज्या शरीरावर आपण एवढं प्रेम करतो त्या शरीराचं शेवटी कुजेल, राख होईल किंवा विष्ठा होईल, हेच सत्य आहे. मरणानंतर शरीर कायमचं नष्ट होईल. मात्र आपला मृत्यू होऊन आपण कायमचे नष्ट होऊ

असा विचार आपल्याला करायचा नसतो.

**आपण इथे निर्वासित (शरणार्थी) आहोत**

आपण खरे कोण आहोत हे शरीर की त्यातील आत्मा? आपली खरी ओळख म्हणजे आपला आत्मा आणि शरीरात फरक आहे, हे मूलभूत सत्य आहे. हे जाणून आपण भौतिक तसंच वासनामय इच्छा बाजूला सारून आत्म्याला शरीरांपासून विरक्त केलं पाहिजे. हा आत्मा कुठून आला असा प्रश्न आपण विचारायला पाहिजे.

आपण देवाचेच एक घटक (विभिन्नांश) आहोत. हे भौतिक जग आपलं घर नाही. इथे आपण आश्रित आहोत. एके दिवशी क्षणार्धात आपल्याला हे सगळं सोडावं लागेल. त्यानंतर आपण कुठे जाऊ?

**आपल्याला हवं शुद्ध प्रेम आणि आत्मीयता**

आधुनिक शास्त्रज्ञांनी अण्वस्त्रांचा शोध लावला, अजूनही त्यावर संशोधन सुरू आहे. संपूर्ण जगाचा निमिषार्धात नाश होईल अशी शक्तिशाली शस्त्र तयार करण्याचा या शास्त्रज्ञांचा प्रयत्न आहे. मात्र याला प्रगती म्हणता येणार नाही. पती-पत्नी, वडील-मुलगा यांच्यातले प्रेम कुठे आहे? दोन देशांमधले सौहार्दाचे संबंध कुठे आहेत. दोन देशांदरम्यान पारपत्र आणि व्हिसासाठी इतकी गुंतागुंतीची आणि अवघड प्रक्रिया का आहे? मी नियमितपणे भारतातून इतर देशांमध्ये जातो. लोकांना श्रीकृष्णभावनामृताची शिकवण देणे एवढा माझा एकच उद्योग आहे. तरीही हे अधिकारी ही प्रक्रिया इतकी अवघड का बनवतात?

भौतिक शास्त्रातील प्रगती आणि नव्या शोधांमुळे जग जवळ येत चाललंय. मात्र दुर्दैवानं त्यामुळे समस्या वाढताहेत. याचं मूळ कारण प्रत्येकाच्या हृदयातून प्रेम आणि आत्मीयता नाहिशी होत चाललीय. त्यामुळे प्रत्येक जण दुःखी आहे. त्यामुळे एकमेकांवर वर्चस्व गाजवण्यासाठी ते भांडतात.

लोक त्यांच्या वैवाहिक जीवनात किंवा सामाजिक जीवनात दुःखी आहेत. लोकांच्या सुखाच्या कल्पना एवढ्या प्रगत झाल्या असत्या तर एखाद्या कुत्र्यानं आपली मैत्रीण बदलावी त्यानुसार लोकांनी आपली बायको का बदलली असती?

प्रत्येकालाच जीवनात शांतता आणि आनंद हवा आहे. मात्र भौतिक प्रगतीमुळे कुणी आनंदी झालंय असं मला वाटत नाही. आनंद हा प्रेमावर अवलंबून असतो. प्रेम, आत्मीयता असल्याशिवाय आपण खरा आनंद शोधू शकत नाही. आपल्याला निखळ आनंद, शुद्ध प्रेम आणि आत्मीयतेची खरी गरज आहे. ते आपल्याला सापडत नसले तरी त्यांचं अस्तित्व मात्र नक्की आहे.

अशा अपरीपूर्ण व्यक्तींवर अशुद्ध प्रेम आणि आत्मीयतेतून आपण आनंद शोधण्याचा प्रयत्न करतो. वेद-पुराणे आपल्याला असं सांगतात सर्वश्रेष्ठ, विशुद्ध पूर्ण पुरुषोत्तम भगवंतावर प्रेम आणि अनन्यभाव ठेवूनच आपण आनंदी राहू शकतो.

वेद आणि उपनिषदांत आपण वाचतो की आपण त्या भगवान श्रीकृष्णांचेच घटक (विभिन्नांश)

आहोत. दुर्दैवानं आपण हे विसरून या भौतिक जगात मायेने जखडले गेलो आहोत. जीवनातली सगळी दुःख, यातना या मायेमुळेच आहेत. जन्म, मृत्यू, वृद्धत्व, आजार हे सारं काही तिच्यामुळेच घडतं. याचा अर्थ असा की आम्ही समजायला हवं की आम्ही या जगात कधीही सुखी होऊ शकणार नाही. भौतिक गोष्टींची तरतूद करून, इच्छा पूर्ण करून, साधन-संपत्ती जमा करून आपण आनंदी होऊ शकत नाही. भगवान श्रीकृष्णाची सेवा करून आपण या जगात आणि त्यानंतरही आनंदी होऊ शकतो. आपण सतत त्यांच्या नावाचा जप आणि लीला, महिमेच स्मरण केलं पाहिजे.

**निर्माता-नियंता-संहारक**

ज्यांनी या जगाची निर्मिती केली त्या सर्वश्रेष्ठ पूर्ण-पुरुषोत्तम परमेश्वराप्रती आत्मीयता वाढवली पाहिजे. ते या जगाचा आधार आहेत. जेव्हा हे जग वृद्ध होते तेव्हा ते पुन्हा त्यांच्याकडे परतते. परमेश्वराला इंग्रजीत गॉड (God) म्हणतात. याचा काय अर्थ आहे?

या शब्दातल्या जी(G) आद्याक्षराचा अर्थ आहे 'जनरेटर' अर्थात सृष्टीची निर्मिती करणारे. ओ(O) आद्याक्षराचा अर्थ आहे 'ऑपरेटर' अर्थात नियंता. तेच जगाचा आधार आहेत. त्यांच्या आधाराशिवाय या जगाचे अस्तित्वच संपेल. डी(D) आद्याक्षराचा अर्थ आहे 'डिस्ट्रॉयर' अर्थात संहारक.

**शाश्वत-मंगल-सुंदर**

परमेश्वर 'सत्यम शिवम् सुंदरम्' आहेत. 'सत्यम्' म्हणजे त्यांचा जन्म अथवा मृत्यू होत नाही. ते शाश्वत आहेत. परमेश्वर एकच आहे, अनेक नाही. सर्व वेद पुराणांमध्ये सांगितलेलं आहे की कृष्ण हेच परमेश्वराचे सर्वश्रेष्ठ रूप आहे, मात्र त्यांची अनेक नावं आहेत.

परमेश्वर 'सुंदरम्' आहेत. कृष्णांइतके सुंदर कोणीही नाही. एका सुंदर किशोराप्रमाणे, त्यांचे रूप चिरतरुण आहे. त्यांचे शरीर सुबक आणि रेखीव आहे. त्यांचे सुरेख व डौलदार शरीर तीन जागी वक्र आहे - त्यांचे पायाचे घोटे, त्यांची कंबर आणि त्यांची मान. सुहास्य वदनाने बासरी वाजवतायत आणि त्यांच्या शरीराला मंत्रमुग्ध करणारा परिमळ, सुवास आहे. ते जगातल्या प्रत्येकाला अगदी त्यांच्या आवडत्या गायींनाही आध्यात्मिक जगताकडे आकर्षित करतात. प्रत्येकाला सुंदर गोष्टी आवडतात. मात्र एखाद्या सुंदर व्यक्तीत दुर्गुण असतील तर आपण त्याच्यावर प्रेम करू शकत नाही. त्यामुळेच परमेश्वर हे शिवम् म्हणजेच मंगल असले पाहिजेत.

भगवान श्रीकृष्णामध्ये मांगल्य व सर्व शुभ गुण ओतप्रोत भरलेले आहेत. ते सर्वात शक्तिशाली आहेत, मात्र ते सर्वश्रेष्ठ करुणेचा सागरही आहे, दयाळू आहेत.

**कृष्णांशी प्रेमाचे नाते**

कृष्ण हेच 'सत्यम्' अर्थात शाश्वत आहेत, 'शिवम्' अर्थात अतिशय दयाळू, 'सुंदरम्' अर्थात सुंदर

आहेत. ते सर्वसमावेशी असल्यामुळे सर्व इच्छा पूर्ण करू शकतात. तुम्ही नृसिंहदेवांबद्दल ऐकलं असेल. नृसिंहदेवही कृष्णाचेच रूप आहेत. सिंहाचे मुख असलेले नृसिंह देव अतिशय शक्तिशाली आणि रौद्र आहेत. मात्र त्यांचं स्वरूप कृष्णासारखं सुंदर नाही. प्रभू श्रीरामचंद्र सुंदर आहेत परंतू ते सर्व इच्छा पूर्ण करू शकत नाहीत. येशू ख्रिस्त अतिशय प्रभावशाली आहेत. आई किंवा वडिलांप्रमाणे ते आपलं रक्षण करतील. मात्र आपण एखाद्या जिवलग सख्याप्रमाणे त्यांच्याशी खेळू शकत नाही. आपण आपल्या पतीप्रमाणे त्यांच्याशी नातं जोडू शकत नाही. नृसिंहदेव सगळ्यांचे रक्षण करतात मात्र त्यांच्या रौद्र रूपामुळे ते मित्र होऊ शकत नाहीत. मात्र कृष्णांच्या व्यक्तिमत्त्वात ही सगळी रुपं सामावली आहेत.

त्यांचं सौंदर्य आणि त्यांच्या करुणेला तोड नाही. ते सर्वव्यापी आणि त्रिकालदर्शी आहे. त्यांच्यात सर्व सद्गुण आहेत. आपण जशी इच्छा करू त्याप्रमाणे ते आपल्याशी नातं जोडतील. आपण त्यांचे सेवक होऊ शकतो किंवा जिवलग सखाही होऊ शकतो. आपण पालकाप्रमाणे त्यांची काळजी घेऊ शकतो किंवा त्यांच्याविषयी प्रियकराचा भावही मनात ठेवू शकतो.

तुमच्या मनात कृष्णाविषयी थोडी जरी आत्मीयता असेल तर ते तुमच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करतील. ते परम-पुरुषोत्तम भगवान आहेत, परमेश्वराचं मूळ रूप आहे. जे प्रभू श्रीरामही देऊ शकत नाहीत ते कृष्ण देऊ शकतात.

आपल्या मनात कृष्णांबद्दल थोडंसं प्रेम आणि आत्मीयता असेल तर आपण नेहमी आनंदी राहू शकतो. आपण केवळ याच जगात नाही तर पुढच्या जन्मी आणि जन्मोजन्मी सुखी राहू शकतो. कृष्णभक्तीने मोक्ष मिळाल्यानंतरही आपण आनंदी राहू शकतो.

**चैतन्य महाप्रभूंचे अभियान**

प्रेम आणि आत्मीयतेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या कृष्णांप्रती, आपण अनन्यभाव निर्माण करायला हवा. हेच सांगण्यासाठी चैतन्य महाप्रभू अवतरले. गोकुळातल्या गोपींप्रमाणे कृष्णांवर प्रेम करा हेच त्यांनी सांगितलं. चैतन्य महाप्रभू हेच कृष्ण आहेत. त्यांनी अवतार धारण केला कारण ते निरपेक्षपणे कृपावर्षाव करणारे आहेत. आपण सर्वजण श्रीकृष्णांचेच घटक असल्यामुळे ते सर्वांवर प्रेम करतात. कृष्णाप्रती प्रेमभाव आणि आत्मीयता जागृत करण्यासाठी ते आले. जगरहाटी, भौतिक सुख, खोटा अहंकार आणि फसव्या सुखापासून आपल्याला दूर करून, श्रीकृष्णांच्या अधिक जवळ नेण्यासाठी चैतन्य महाप्रभू अवतरले. ते आपल्याला शाश्वत कृपा, प्रेम आणि आत्मीयता देतात, ज्यामुळे आपण आनंदी आणि शांत होतो. अर्थात त्यासाठी त्यांनी आपल्याला जे दिलंय ते आपल्याकडे असायला हवं. चैतन्य महाप्रभूंनी या जगात येऊन, सर्वांना सुखी करण्यासाठी एक नवा संदेश दिला. 'श्रीचैतन्य-चरितामृत' वाचल्यानंतर तुम्हाला ते सविस्तर कळेलच. त्यांनी आपल्या परम भक्तांसाठी उच्च कोटीतल्या प्रेमाचं तत्त्वज्ञान सांगितलं. सामान्य लोकांनाही त्यांनी अतिशय सोप्या भाषेत संदेश दिला. एवढंच काय, वृंदावनाच्या मार्गावर जंगलातल्या वाघ, अस्वल, हत्ती यासारख्या वन्य प्राण्यांनाही त्यांनी आपलं दैवी

प्रेम दिलं.

**हरिनाम जपातून आनंद**

तुम्हाला आनंदी व्हायचं असेल, पूर्ण-पुरुषोत्तम परमेश्वराचं प्रेम आणि आत्मीयता अनुभवायची असेल तर तुम्ही, **हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे, हरे राम हरे राम, राम राम हरे हरे,** हा जप करावा. त्यामुळे तुम्हाला शाश्वत आनंद मिळेल. त्याशिवाय अन्य दुसरा मार्ग नाही. चैतन्य महाप्रभू यासाठी पुराणातल्या या मंत्राचा दाखला देतात,

*हरेर्नाम हरेर्नाम हरेर्नाम एव केवलम्*

*कलौ नास्तेव नास्तेव नास्तेव गतिरन्यथा*

'भांडण-तंटे, दंभ आणि खोटारडेपणाने ग्रासलेल्या या कलियुगात आपण फक्त त्यांचे मंगल नाम जपावे, त्याशिवाय अन्य कोणताही मार्ग नाही.'

आम्ही पाश्चिमात्य देशांमध्ये चैतन्य महाप्रभूंनी दिलेला हाच संदेश देण्यासाठी आलो आहोत. प्रेम आणि आत्मीयतेचा हा संदेश अतिशय सखोल आहे मात्र आम्ही तो अतिशय थोडक्यात आणि सोप्या भाषेत देतोय. हे गहन तत्त्वज्ञान समजून, आचरणात आणण्यासाठी लोकांनी सर्वप्रथम, **हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे, हरे राम हरे राम, राम राम हरे हरे,** हा जप सुरू करावा. हा संदेश आधी त्यांनी सोप्या पद्धतीनं समजावून घ्यावा. नंतर पवित्र नाम जप आणि श्रीकृष्णभावनामृताच्या साधनेतून त्यांना हा संदेश अधिक सखोल आणि सविस्तर कळेल. नाम जपातून श्रद्धा, ठाम समर्पण (निष्ठा), भक्तिभावे सेवेप्रति रुची, श्रीकृष्ण आणि त्याच्या सोबत्यांशी (परिकरांशी) दिव्य अनुबंध (आसक्ती), सर्वोच्च आनंदी भाव, त्यानंतर कृष्णाप्रती संपूर्ण दिव्य प्रेम आणि अनन्यभाव अशा क्रमाने पद्धतशीरपणे प्रगती होत जाईल. पूर्ण-पुरुषोत्तम परमेश्वराप्रती प्रेम निर्माण करण्यासाठी चैतन्य महाप्रभूंनी भक्तांना सामूहिक संकीर्तन करण्याचीच पद्धत सांगितली आहे.

# भाग दुसरा

# माझे अभियान

*या दुसऱ्या भागात श्रील नारायण गोस्वामी महाराज आपल्या शिष्यांना आपले लक्ष्य काय आहे हे समजावून सांगतात. ते इथे काय सांगताहेत हे समजावून घेण्यासाठी आपल्याला गुरु-शिष्य परंपरेबाबत थोडी माहिती असणं आवश्यक आहे. श्रील नारायण गोस्वामी महाराज हे गौडीय वैष्णव परंपरेतले आहेत. ही गुरु-शिष्य परंपरा श्री चैतन्य महाप्रभू किंवा प्रभू चैतन्यांपासून सुरू होते. ते पाचशे वर्षांपूर्वी होऊन गेले. श्रीकृष्णभावनामृताची शिकवण आणि त्याप्रमाणे आचरण पुनरुज्जीवित करून त्याला प्रोत्साहन देण्याचं कार्य चैतन्य महाप्रभूंनी केलं. चैतन्य प्रभू हेच भगवान श्रीकृष्ण असल्याचे अकाट्य (अखंडनीय) ठोस पुरावेही आहेत. परमेश्वरानं स्वतःच्याच भक्ताचं रूप धारण करून, श्रीकृष्णभावनामृताचा आदर्श आपल्यापुढे ठेवला. जे वैष्णव चैतन्य महाप्रभूंनाच कृष्ण मानून त्यांच्या शिकवणीनुसार आचरण करतात त्यांना गौडीय वैष्णव म्हणतात.*

*सर्व वैष्णव कृष्ण अर्थात विष्णूंची समर्पण भावनेनं सेवा करण्याची इच्छा करतात. व्रज किंवा वृंदावनवासी ज्या प्रेम भावनेनं कृष्णाची सेवा करतात, त्यावर गौडीय वैष्णवांचा विशेष भर असतो. व्रजवासी कृष्णांवर निखळ प्रेम करतात, आदरयुक्त भीतीने त्यांची उपासना करत नाहीत. शुद्ध निःसीम भक्ती आणि अनौपचारिक आत्मीयतेनं ते कृष्णांच्या अतिशय गोजिऱ्या रूपाची पूजा करतात.*

**आमचे अभियान**

कुणीतरी मला विचारत होतं, 'की तुमचा उद्देश काय? तुम्ही इथे काय द्यायला आला आहात?' चैतन्य महाप्रभू आणि त्यांच्या परंपरेतल्या गुरुंचे जे अभियान होते तेच माझेही आहे. जगातल्या प्रत्येकाला त्यांची जात-पात, शिक्षण याचा विचार न करता प्रेम आणि जिव्हाळा देणं हाच आमचा उद्देश आहे. व्रजवासीयांचा कृष्णांप्रति जो सेवाभाव आहे, तेच प्रेम आणि आत्मीयतेचं सर्वोच्च रूप आहे. ज्यांना या सर्वोत्तम प्रेमाची आणि आत्मीयतेची गरज आहे आणि जे त्यासाठी पात्र आहेत त्यांना आम्ही ते देतो. मात्र तुम्हाला याची जाणीव हवी की ज्याचं भगवान श्रीकृष्णांवर खरोखर प्रेम आहे व त्यांच्याबद्दल आत्मीयता आहे, त्याच्या मनात सगळ्या प्राणिमात्रांबद्दल प्रेम आणि जिव्हाळा हवा. तो कुठल्याही प्राण्याची हत्या करणार नाही तसंच मांस किंवा अंडी खाणार नाही. कुठल्याही जीवित प्राण्याला तो इजा पोहोचवणार नाही, एवढंच काय साधं गवताचं पातंही विनाकारण तोडणार नाही. ज्यांचं श्रीकृष्णांवर प्रेम आहे, आत्मीयता आहे ते इतरांबद्दल प्रेम आणि आत्मीयता दाखवून त्याला प्रसन्न करतील.

**प्रेम, आत्मीयता आणि दया**

कृष्णांचेच घटक (विभिन्नांश) असलेल्या इतरांवर आपण दया केली नाही तर आपलं कृष्णावरचं प्रेम आणि आत्मीयता खरी कशी असू शकेल. कधीकधी या पाश्चिमात्य देशांमध्ये मी जेव्हा फिरायला जातो

तेव्हा विचार करतो की, 'मी इथे यायला नको होतं'. कारण मला पाहून कुरणात चरणारी गाई-वासरं भीतीनं थरथर कापत दूर पळतात. त्यांना वाटत असेल, 'या लोकांना आपली थोडीशीही दया येत नाही. ते आपल्याला बंदिस्त करतात. काही काळानं कत्तलखान्यात नेऊन आपली हत्या करतात.' प्राण्यांवर हल्ला करून त्यांना ठार मारण्याचा अधिकार आपल्याला आहे असा विचारही कुणी कसा करू शकतो? जर त्यांच्या मनात प्राण्याबद्दल दया नसेल तर कृष्ण त्यांच्याबद्दल दया दाखवेल का? आपण बघतो की अनेक प्रसिद्ध धार्मिक नेते, वासरांच्या हत्येला कारणीभूत आहेत. ते त्याचं मांस खातात. ती लहान वासरं मरताना जीवाच्या आकांतानं रडतात. त्यांचा हा आक्रोश कुणापर्यंत पोहोचेल. कृष्णांना कान नाहीत का? अशा धार्मिक नेत्यांना असं वाटतं की आपण अतिशय उच्च दर्जाचे नेते आहोत. परमेश्वराचे सेवक आहोत. पण त्या वासराला त्यांच्याबद्दल काय वाटत असेल? आपल्याला समजतं की या नेत्यांना प्राण्याबद्दल जराही प्रेम किंवा आत्मीयता नाही. हे प्राणीही कृष्णांचीच अपत्ये आहेत. ते कृष्णांचे शाश्वत सेवक आहेत. म्हणूनच आपण त्यांच्यासमोर कृष्णांचे पवित्र नाम **हरे कृष्ण हरे कृष्ण** जपतो.

**बनावटपणा नको**

गुरु हा सर्वसंग परित्याग केलेला, निःसीम भक्त असला पाहिजे. त्याच्यात बनावटपणा नको. त्याच्यात दया आणि करुणा ओतप्रोत भरलेली हवी. कृष्णांबद्दल प्रेम आणि आत्मीयता जागृत करणं ही माझी मोहीम आहे. जेव्हा लोकांमध्ये ती निर्माण होईल तेव्हा आपोआप त्यांच्या मनात सर्व प्राणिमात्रांबद्दल प्रेम आणि जिव्हाळा असेल. तुम्ही सगळ्यांनी या पातळीवर पोहोचावं हीच माझी मोहीम, माझा उद्देश आहे.

माझ्या शिष्यांनी या सूचना ऐकाव्यात. प्रेम तसंच आत्मीयतेचे हे गुण अंगी बाणवण्याचा प्रयत्न करा आणि कृष्णांवर प्रेम करा. सर्वांवर दया करण्याचा प्रयत्न करा, हा संदेश असलेल्या दिव्य साहित्याचं वाटप करा आणि सार्वजनिक ठिकाणी श्रीकृष्णांच्या नावाचे संकीर्तन करा. जे लोक या संदेशापासून अनभिज्ञ आहेत त्यांच्यापासून ते अगदी वासरू, निष्पाप प्राणी यांच्यापर्यंत सगळ्यांच्या कानावर श्रीकृष्णाचं नाव पडलं पाहिजे, त्यांना त्याचा फायदा झाला पाहिजे. त्यांनी इच्छा न करताही, प्रभू-नामाने ते शुद्ध होतील. चैतन्य महाप्रभूंनी सांगितलंय, 'सार्वजनिक ठिकाणी कृष्णांच्या नावाचे संकीर्तन करा, लोक तुम्हाला हसले, तुमची चेष्टा केली तरी काळजी करू नका.'

श्रीभक्तिविनोद ठाकुरांनी लोकांकडे जाऊन त्यांना श्रीकृष्णभावनामृताची शिकवण देण्याची मोहीम उघडली. तुम्ही त्यांच्या सूचना आणि उदाहरणांचं पालन करा. कृष्णांवर प्रेम आणि आत्मीयता वाढवा आणि इतरांना ती वाढवायला मदत करा. तुम्ही हे खरोखरच करत असाल तर मी प्रसन्न होईन, श्रीकृष्ण प्रसन्न होतील. त्यानंतरच तुम्ही खरे शिष्य व्हाल, त्याशिवाय नाही.

*गौर प्रेमानंदे! हरी बोल!*

# भाग तिसरा

# सुदामा ब्राह्मण

**परिचय**

*आधुनिक भौतिक संस्कृति, आनंद निर्माण करू शकली नाही. मात्र पुरातन काळातल्या सुदामा ब्राह्मणांच्या गोष्टीतून आपण शिकतो की, गरीब असूनही, काही आध्यात्मिक तत्त्वाचं आचरण केलं तर आपण सुखी होऊ शकतो. या लीलेतून आपण हे देखिल शिकतो की समर्पण भावनेनं भक्ती करणाऱ्यांची, आपण कल्पनाही करू शकणार नाही अशी काळजी श्रीकृष्ण घेतात.*

**कृष्ण अतिशय दयाळू आहेत**

कृष्ण सर्व शक्तिशाली आहेत. सर्व प्रकारच्या शुद्ध प्रेमात्मक तथा वात्सल्यमय दिव्य संबंधांच्याद्वारे मिळणाऱ्या आनंदांचे ते सागर आहेत. ते देवाधिदेव आहेत. श्रीराम, नृसिंह आणि इतर अवतारांचेही ते मूळ आहेत. कृष्ण हे अतिशय दयाळू आणि कृपाळू आहेत. त्यांना कुणी फक्त पान, फळ किंवा पाणी दिलं तरी ते त्याचा स्वीकार करतात. अतिशय गरिबीमुळे जर कोणाकडे कृष्णांना अर्पण करण्यासाठी काहीच नसल्यास, कृष्ण म्हणतात, 'निराश होऊ नकोस. तू मला पान अर्पण करू शकतोस.' पानाचा खरा अर्थ म्हणजे 'तुळशी' पत्र जे कृष्णाला अतिशय प्रिय आहे. मात्र तुमच्याकडे तेही नसेल तर अगदी कुठल्याही झाडाचं पान किंवा एखादी साधी कळी सुद्धा अर्पण करू शकता.

तेही नसेल तर अगदी गवत सुद्धा अर्पण करू शकता किंवा तुम्ही कृष्णांना पाणी देऊ शकता जे सगळीकडे मुबलक व मोफत उपलब्ध आहे. जेव्हा तुम्ही कृष्णांना प्रेमानं काही देता तेव्हा ते विचार करतात, 'या प्रेमाची परतफेड मी कधीही करू शकणार नाही.' ते इतके दयाळू आहेत की तुम्ही अगदी थोडंसं त्यांना दिलं तरी ते म्हणतील, 'त्यानं मला किती दिलं.'

कृष्ण किती कृपाळू आणि दयाळू आहे हे आपल्याला श्रीमद्भागवतातील एक आनंददायक लीला वाचून कळतं. या जगात त्यांची तुलना दुसऱ्या कुणाशीच होऊ शकत नाही.

**सुदामा आणि त्यांची पत्नी**

कोणे एके काळी सुदामा नावाचे ब्राह्मण होते. जो आत्मतत्त्वाचे विज्ञान जाणतो आणि धीर आहे तो आहे ब्राह्मण. ब्राह्मण व्यक्ती या सृष्टीच्या व्युत्पत्तीचं कारण अर्थात ब्रह्म जाणतो. सुदामा वैष्णव होते. ते कृष्णांची पूजा करत असत. कृष्ण हेच परमेश्वराचे सर्वश्रेष्ठ रूप आहे. पृथ्वीवर ते सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांनी राक्षसांचा संहार केला आणि भक्तांना आनंद दिला. सुदामांना याची कल्पना होती. ते सतत कृष्णनामाचा जप करून त्यांच्या लीलांचं स्मरण करण्यात रममाण होत असत. ते कृष्णांच्या द्वारकेजवळ राहतं असत. द्वारका अद्वितीय आणि दैवी समृद्धतेनं नटलेली नगरी होती.

सुदामा विवाहित होते. त्यांची पत्नी एक पतिव्रता होती. ब्राह्मणानं भिक्षा मागून उदरनिर्वाह करावा आणि आपलं जीवन आध्यात्मिक प्रगतीसाठी समर्पित करावं अशी अपेक्षा असते. सुदामा अतिशय गरीब होते. मात्र ते फार घरी भिक्षा मागत नसत. जेवढं मिळेल त्यातच ते समाधानी होते.

काही लोक विचार करतात की, 'मी गरीब आहे. त्यामुळे अधिक पैसे मिळवण्यासाठी काहीतरी केलं पाहिजे.' मात्र सुदामा समाधानी होते. त्यांना आत्मा आणि परमात्म्याची जाणीव झाली होती. परमात्मा अणुरेणूंमध्ये वसलेला असल्याचं त्यांना उमगलं होतं. ते कृष्णाचे श्रेष्ठतम भक्त होते. त्यामुळे कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी असूनही त्यांना पैसे कमावण्याची चिंता नव्हती. ते सतत नामस्मरणात दंग असत. ते केवळ दोन-तीन घरी भिक्षा मागत असत.

सुदामांकडे धड कपडे नव्हते. आपल्या पत्नीलाही ते उंची वस्त्र आणि आभूषणं देऊ शकत नव्हते. तिची वस्त्रंही जीर्ण शीर्ण होती आणि तरुण असूनही देह सुकलेला होता. मात्र तीही आपले पती जे काही आणीत त्यात समाधानी होती. पाश्चिमात्य देशांमध्ये मी ऐकतो की काही पत्नी काम करून उदरनिर्वाह चालवतात. त्यांचे पती काहीच करत नाहीत. मात्र भारतीय संस्कृतीत तसं नाही. अर्थात भारतातही आता हळूहळू अशी पद्धत येऊ लागलीय. सुदामांची पत्नी घरी राहून सतत त्यांची सेवा करत असे. पती जे काही घरी आणेल त्यातूनच ती स्वयंपाक करीत असे. त्यातलं बहुतांश अन्न ती पतींनाच वाढी. त्यांना याची जाणीव होती. त्यामुळे ते स्वतः अर्ध खाऊन तिच्यासाठी बाकीचं अन्न ठेवत असत. दोघांनाही खाण्यासाठी पुरेसं अन्न नसूनही ते समाधानी होते.

ती त्यांना कधीही व्यत्यय आणायची नाही. कारण तिला कल्पना होती की ते अतिशय उच्च कोटीतले ब्राह्मण आणि परमभक्त आहेत. ती आपल्या पतींना नेहमी मदत करीत असे आणि आज्ञाधारकपणे त्यांची सेवा करी असे. ती कधीही त्यांच्याशी भांडण करत नसे किंवा कटकट करत नसे की, 'तुम्ही मला चांगलं खायला, दागिने किंवा कपडे का आणत नाही? तुम्हाला माझी काळजी घेता येत नाही तर लग्नच कशाला केलं?' ती अजिबात अशी नव्हती. ती अतिशय आज्ञाधारक आणि नम्र होती.

**कृष्ण- अपूर्व सखा**

एके दिवशी सुदामा आपल्या साधनेत रममाण असताना त्यांची पत्नी त्यांच्याजवळ आली आणि त्यांना म्हणाली, 'आज तिसरा दिवस आहे आपण उपाशी आहोत. मला माझी काळजी नाही. मात्र तुमची अतिशय काळजी वाटते. घरात शिजवायला अन्नाचा कण नाही. मी रोज शेजाऱ्यांकडून मागून आणायचे. मात्र आता मला त्यांना मागायची लाज वाटते.

'मी विचार करत होते की श्रीकृष्ण तुमचे जिवलग मित्र आहेत. ते अतिशय उदारही आहेत कारण ते परब्रह्म, पूर्ण स्वतंत्र सत्य आहेत. तुमच्यासारखा ब्राह्मण त्यांच्याकडे गेला तर ते इतकं दान करतील की आपण कल्पनाही करू शकत नाही. तर मग तुम्ही आपल्या परम-पुरुषोत्तम मित्राकडे का जात नाही?'

'मी तसं करू शकत नाही' सुदामा म्हणाले. 'मी माझे दिव्य स्वामी, कृष्णाकडे कसलीही भीक मागू

शकत नाही. मी त्याच्याकडे जाऊन काही मागणारा सेवक नाही. कदापि नाही'

त्यावर पत्नी म्हणाली, 'तुम्हाला काही मागण्याची गरजच नाही. ते जेव्हा बघतील की तुम्ही अतिशय गरीब ब्राह्मण आहात. तेव्हा तेच तुम्हाला न मागता एवढं भरभरून देतील की तुम्ही कल्पनाही करू शकणार नाही. ते इतके भक्तवत्सल आहे की तुम्हाला पाहताच तो आपणहून दान देतील.

'तुम्ही फक्त त्यांना भेटायला जा. तुम्ही त्यांना काही सांगायची गरज नाही, कारण ते तुमचे हृदय जाणतात.'

पत्नीनं अनेक दिवस समजावल्यानंतर सुदामानं विचार केला, 'मला जायला हवं. मला काही मागण्याची गरज नाही. त्यानं मला काही दिलंच तर आनंद आहे. मला माझ्या परम-पुरुषोत्तम स्वामी कृष्णचंद्रांच्या पदकमळांचं दर्शन होईल. तेच माझ्यासाठी जास्त महत्त्वाचं आहे. त्यासाठी मला जायला हवं.'

त्यानंतर सुहास्य वदनानं ते पत्नीला म्हणाले, 'त्याला अर्पण करण्यासाठी मला काहीतरी दे. मी जेव्हा त्याच्याकडे जाईन तेव्हा तो विचारेल तू माझ्यासाठी काही भेट आणली आहेस का? तेव्हा मी काय उत्तर देऊ?'

घरात एक तांदळाचा दाणाही नव्हता. पत्नीनं शेजारून दोन-तीन मुठी पोहे मागून आणले. ते बांधायला तिच्याकडे स्वच्छ कापडही नव्हतं. तिनं एका जुन्या वस्त्रात पोहे बांधले आणि ती पुरचुंडी सुदामांना दिली. ती घेऊन सुदामा नामस्मरण करत, मित्राचा विचार करत मार्गस्थ झाले.

**अपूर्व द्वारका**

रस्त्यात सुदामा विचार करत होते, 'द्वारकेत गेल्यावर श्रीकृष्णाला कसं भेटायचं. तो तर सर्व राजांचाही सम्राट आहे, द्वारकेचा राणा आहे आणि मी तर एक गरीब रस्त्यावरील भिक्षुक आहे. सांदिपनी ऋषींच्या आश्रमात एकत्र घालवलेले दिवस त्याला आठवतील का?' ते दिवसभर चालत होते. संध्याकाळी ते महान आणि अपूर्व अशा द्वारकेत पोहोचले. कृष्णांच्या, सोळा हजार एकशे आठ राण्यांसाठी वेगवेगळे महाल होते. त्यांच्या सुंदर दासींसाठीही महाल होते. नगरात पोहोचण्यासाठी त्यांनी तीसपेक्षाही अधिक द्वारं लागोपाठ पार केली. प्रत्येकानं त्यांना आदर आणि सन्मानाची वागणूक दिली, त्यांना नमस्कार केला कारण त्यांनी धारण केलेल्या जानव्यावरून ते ब्राह्मण असल्याचं त्यांनी जाणलं. त्यांच्यावर कोणतेही निर्बंध नव्हते. अगदी सिंगापूर विमानतळावर ज्याप्रमाणे तपासणी केली जाते त्याप्रमाणे द्वारपालांनी इतरांची मात्र कसून तपासणी केली.  कृष्णांकडे कसं जायचं असं सुदामांनी विचारल्यावर त्यांना रुक्मिणीच्या महालाकडे जायला सांगण्यात आलं. ती कृष्णांची पट्टराणी होती. सुदामा तिच्या महालात पोहोचल्यानंतर त्यांना तिच्या शयनगृहाकडे नेण्यात आलं. तिथे कृष्ण अत्यंत उंची, आणि आरामदायक अशा रत्नजडित सुवर्ण शय्येवर आराम करत होते. इतर राण्या त्यांची सेवा करत होत्या. त्यांना वारा घालत होत्या. कृष्णानं सुदामांना पाहताच अनवाणी पायानंच धावत जाऊन त्याला घट्ट मिठी मारली.

'तो किती दयाळू आहे' असा विचार करत सुदामानं आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

**कृष्णांचे आदरातिथ्य**

कृष्णांनी सुदामांना आपल्या मंचकावर बसवलं. तिथे आजपर्यंत कृष्ण आणि रुक्मिणीशिवाय अन्य कुणीच बसलेलं नव्हतं. कृष्ण स्वतः खाली बसले. सुदामांचे पाय सुवर्णपात्रात ठेवले आणि ते धुण्यासाठी गुलाबपाणी मागवले. कृष्णांनी आपल्या राण्यांना सांगितलं, 'हाच माझा देव आहे. परमेश्वराइतकाच तो मला पूजनीय आहे. तुम्ही त्याला वारा घाला आणि त्याचे पाय धुण्यासाठी मला पाणी द्या.' सुदामांचे पाय अतिशय मळके आणि भेगाळलेले होते. त्यांच्याकडे जोडे नव्हते. त्यांनी एक फाटकं धोतर नेसलं होतं आणि गळ्यात एक कापड लटकवलं होतं, कारण त्यांच्याकडे धड अंगरखाही नव्हता. रुक्मिणीच्या मंचकावर बसून कृष्णाकडून पाय धुऊन घेताना ते फारच वरमले, ओशाळले. प्रत्येकजण विचार करत होता,'कृष्ण हे काय करतायत आणि हा कोण ब्राह्मण आहे ज्याला ते एवढा सन्मान देतायत?' त्यानंतर कृष्णांनी सुदामांच्या पायाचं तीर्थ घेतलं आणि आपल्या शरीरावर शिंपडलं. त्यानंतर त्यानं ते तीर्थ राण्यांना दिलं आणि म्हणाला,'हे सगळीकडे शिंपडा. आज आपण सगळे शुद्ध झालो आहोत.'

इथे आपण खऱ्या भक्ताचा महिमा लक्षात घेतला पाहिजे. ह्या प्रथा, परंपरा पुरातन वैदिक काळापासून चालत आल्या आहेत. मात्र या आध्यात्मिक परंपरांची शक्ती, तेज आपल्याला माहिती नाही. मात्र कृष्णांनी आपल्याला हे शिकवलं. त्यानं आपल्या सर्व अपत्यांचा अर्थात भक्तांचा असाच आदर सत्कार व्हावा हे शिकवलं.

सुदामांच अशा रितीनं स्वागत केल्यावर कृष्ण त्यांच्या खांद्यावर हात ठेवून एखाद्या जिवलग मित्राप्रमाणे बोलू लागले. दरम्यान सुदामा तिथलं अपूर्व वैभव न्याहाळत होते. तिथल्या भिंती आणि खांब सोन्याचं होते. त्यांना रत्न, माणकं जडवलेली होती आणि सर्वोत्तम कारागिरीनं तिथली सजावट करण्यात आली होती. आता कृष्ण स्वतःशीच विचार करू लागले, 'हा ब्राह्मण विचार करत असेल की कृष्णानं मला खरोखरच ओळखलं आहे का? सांदिपनी ऋषींच्या आश्रमात शिकणारा मी सुदामा....बहुतेक तो मला विसरला असेल. केवळ मी ब्राह्मण असल्यामुळे तो माझं आदरातिथ्य करत असेल ' सुदामांना दिलासा देण्यासाठी कृष्ण त्यांच्या आश्रम काळातल्या आठवणी सांगू लागले,' अरे मित्रा तुला आठवतंय लहानपणी सांदिपनी ऋषींच्या आश्रमात आपण अनेक वर्ष एकत्र शिकत होतो? आपण जिवलग मित्र झालो. एक दिवस गुरुपत्नी आपल्याला म्हणाल्या, स्वयंपाकासाठी सुकी लाकडं शिल्लक नाहीत.' लाकडं आणण्यासाठी गेल्यावर काय झालं हे सुदामा आणि कृष्णाला आठवलं.

**वादळात हरवले**

ती संध्याकाळची वेळ होती. आकाश ढगाळलेलं होतं. दोघे मित्र जवळच्याच जंगलात गेले आणि सुकी लाकडं आणि फांद्या गोळा केल्या. त्याच वेळी आभाळ दाटून आलं आणि वादळी पाऊस सुरू झाला. सगळीकडे पाणीच पाणी झालं, अंधारामुळे काही दिसेना. पाणी साचल्यामुळे दोघांनाही कुठे जाता येईना.

ते तसेच एकमेकांना पकडून उभे राहिले. कृष्ण स्वतः परमेश्वर आहेत, सर्वशक्तिशाली आहेत, मात्र आपल्या अद्भुत प्रतापानं ते विसरले की आपण सर्वशक्तिशाली आणि सर्वज्ञ आहोत. ते एखाद्या सर्व सर्वसामान्य मुलाप्रमाणेच झाले होते.

सकाळी सांदिपनी ऋषींनी दोघांची शोधाशोध सुरू केली. त्यांना जेव्हा कळलं की ते लाकडं गोळा करायला गेले होते तेव्हा ते त्यांना शोधत जंगलात पोहोचले आणि हाका मारू लागले, 'अरे कृष्णा, अरे सुदामा तुम्ही कुठे आहात?' सरतेशेवटी सांदिपनी ऋषींना मुले सापडली, ते त्यांच्याशी अतिशय आत्मीयतेनं बोलू लागले, 'तुम्ही अख्खी रात्र इथे घालवली. माझ्या आनंदासाठी तुम्ही सर्व गोष्टींचा त्याग केलात. तुम्ही अतिशय समर्पित आहात. मला असेच शिष्य हवेत.' त्यांनी दोघांच्याही मस्तकावर हात ठेवून त्यांना आशीर्वाद दिला. 'तुम्ही आयुष्यात यशस्वी व्हाल. तुम्ही माझ्याकडे ज्यासाठी आले आहात ते तुम्हाला मिळेल. सर्व वेद आणि उपनिषदांमधली शिकवण, कला, ज्ञान तुम्हाला मिळो.' ते बोलत होते त्याच वेळी त्या दोघांनाही ज्ञानाची जाणीव झाली. त्यानंतर सांदिपनी ऋषींनी त्यांना हाताला धरून आश्रमात आणलं. गुरुपत्नी त्यांची वाटच बघत होत्या. कृष्णांनी जेव्हा लहानपणाची ही आठवण सांगितली तेव्हा सुदामांची खात्री पटली की कृष्णानं केवळ ब्राह्मण म्हणून त्यांचं आदरातिथ्य केलं नाही तर त्यांना खरंच ओळखलं आहे.

**सुदामांची भेट प्रेमानं स्वीकारली**

आता कृष्णांनी स्मित हास्य करून सुदामांना विचारलं, ' माझ्या प्रिय मित्रा मला माहिती आहे तू खाली हातानं येणार नाहीस. वहिनींनी मला देण्यासाठी तुझ्याजवळ नक्कीच काहीतरी दिलं असेल. कुठे आहे ते?' त्यानंतर सुदामांना आपल्यासोबत आणलेल्या पोह्यांची आठवण झाली. ती पुरचुंडी त्यांनी बगलेत ठेवली होती. त्यांनी विचार केला, 'मी कृष्णाला हे कसं देऊ? कृष्ण किती मृदू आहे, हे पोहे किती कठिण आणि बेचव आहेत. त्याशिवाय ते अतिशय जीर्ण शीर्ण कापडात बांधलेत. मी ते कृष्णाला कसे देऊ?' मात्र सुदामा काय विचार करतायत हे कृष्णांना जाणलं आणि हळूच त्यांच्याकडून ती पुरचुंडी काढून घेतली. ती उघडून त्यातले मूठभर पोहे पटकन तोंडात टाकले. ते अत्यानंदानं म्हणाले, 'मला अर्पण केलेला कुठलाही पदार्थ एवढा चविष्ट कधीच नव्हता' तो दुसरी मूठ खाणार तेवढ्यात रुक्मिणी आणि इतर राण्यांनी त्यांना रोखलं. 'कृपया आणखी खाऊ नका. या एका मूठभर पोह्यांसाठी तुम्ही त्यांचा अतिशय राजसी पाहुणचार केला आहे. आता दुसरी मूठ खाल्लीत तर आम्हालाही या ब्राह्मणाला अर्पण करावं लागेल. तुम्ही पुरेसं दिलंय. त्यामुळे आणखी घेऊ नका. नाहीतर आमचा प्राण जाईल.' त्यानंतर कृष्णांनी पोहे खाणं थांबवलं.

**सुदामा माघारी जातात**

यानंतर कृष्ण सुदामांचे पाय चेपत त्यांच्याशी आत्मीयतेनं बोलू लागले. त्यांनी त्याला विविध प्रकारचा चविष्ट प्रसाद खाऊ घातले. सुदामा झोपल्यानंतर रात्रभर कृष्ण त्यांचे पाय चेपत होते. बाह्म

मुहूर्तावर सुदामा उठले, शुचिर्भूत होऊन आपलं आन्हिक आटोपलं. त्यानंतर ते म्हणाले, 'हे कृष्णा, माझ्या सख्या, माझ्या जिवलग मित्रा आता मला माघारी जायला हवं.' कृष्ण म्हणाले,' तू आलास म्हणून मला फार आनंद झाला. तू माझा मित्र आहेस. मी तुला विनंती करतो की वरचेवर येत जा. मी देखिल तुझ्याकडे येईन.' जेव्हा सुदामा निघाला तेव्हा कृष्णही त्यांना निरोप द्यायला गेले. (जेव्हा कुणी वैष्णव किंवा ब्राह्मण आपल्याकडे येतात तेव्हा उभे राहून त्यांचे स्वागत करावे. तसंच निरोप देताना त्यांना गावच्या किंवा शहराच्या वेशीपर्यंत पोहोचवावं) कृष्णांनी सुमधुर गप्पागोष्टी करत आपल्या मित्राला निरोप दिला. एरवी सधन व्यक्ती योग्य ब्राह्मणाला भरभरून भेटवस्तू देतात. मात्र कृष्णांनी सुदामांना काहीच भेटवस्तू दिली नाही. नगरच्या सीमेवर पोहोचल्यावर कृष्ण परतले. सुदामा आले होते तशाच जीर्ण शीर्ण वस्त्रांनिशी माघारी जाऊ लागले. अतिशय आनंदी मनाने ते विचार करत होते, 'कृष्ण किती दयाळू आहे! त्यानं मला धन दिलं असतं तर मी माझ्या श्रीमंतीचाच विचार करत त्याला विसरून गेलो असतो. त्यांनी पाहिलं की माझी पात्रता नाही म्हणूनच त्यांनी मला काही दिलं नाही.' कृष्ण किती दयाळू आणि कृपाळू आहे असा विचार करून सुदामा रडू लागले.

**घराचा कायापालट**

संध्याकाळी ते त्यांच्या गावी पोहोचले. मात्र घराजवळ आल्यावर ते बुचकळ्यांत पडले. 'अरे पावसाळ्यात गळणारी माझी झोपडी कुठे गेली? घरात अन्नाचा कणही नसल्यानं उंदीरही नाहीत. माझी गाय कुठे गेली? तिचाही अक्षरशः सापळा उरलाय. मी ध्यानाला बसतो ते कुशाचं आसन कुठे गेलं? सगळं अचानक नाहीसं झालंय!'

खरोखरच सगळं काही बदललं होतं. ते राहत होता त्या जागी सोळा हजार एकशे आठ राजवाडे उभे होते. विशाल मार्गांवर लोक घोडे आणि हत्तींवर स्वार होऊन जात होते. फुलं-फळांनी बहरलेल्या आणि थंड पाण्याच्या आकर्षक तलावांनी सजवलेल्या अनेक बागा तिथे होत्या. मोर बेभान होऊन नृत्य करत होते तर कबुतरं, कोकीळ पक्षी सुस्वरात कूजन करत होती. सुदामा विचार करत होते, 'अरे हे काय झालंय? मी कुठे आलोय? मी स्वर्गात आहे का?' दरम्यान कुणीतरी त्यांच्या पत्नीला कळवलं, 'तुझे यजमान परत आलेत.' तिला अतिशय आनंद झाला. आनंदानं आपल्या पतींना भेटायला ती बाहेर आली. ती एखाद्या देवदूतासारखी वाटत होती. कारण कृष्णानं तिला रात्री एखाद्या सोळा वर्षाच्या किशोरीसारखे सुंदर बनवलं होतं . तिच्या आजूबाजूला हजारो दासी होत्या. कृष्णाच्या सोळा हजार एकशे आठ पत्नीपैकी प्रत्येकीनं सुदामा आणि त्याच्या पत्नीला काहीतरी दिलं होतं.

कुणी कल्पनाही करू शकणार नाही एवढं ऐश्वर्य आणि संपत्ती त्यांच्याकडे होती. त्यामुळे सुदामांना विश्वासच बसत नव्हता की आपण आपल्याच घरी आलो आहोत. सुदामांच्या पत्नीनं त्यांना येताना पाहिलं, त्यांच्या हातात तीच नेहमीची काठी होती. ते अजिबात बदलले नव्हते. त्यांच्या अंगावर तेच जीर्ण शीर्ण कपडे होते. तरुण असूनही ते वृद्ध आणि गरीब दिसत होते. सुदामांची पत्नी आपल्या लवाजम्यासह वाजत गाजत आपल्या पतीचं स्वागत करण्यासाठी पुढे सरसावली. सुदामांनी पाहिलं की

हा लवाजमा पाण्यानं भरलेले सोन्याचे घडे घेऊन आपलं स्वागत करायला येताहेत. त्यांना आश्चर्य वाटलं, 'ह्या माझ्या दिशेनं का येताहेत? मी कुणीतरी दुसराच असल्याचा यांचा गैरसमज झाला असावा.' पण तसं काहीच नव्हतं. कृष्णांनी सुदामांचाही कायापालट करून टाकला असता तर त्यांची पत्नी त्याला ओळखूच शकली नसती. म्हणून त्यांनी सुदामांना बदललं नाही. जेव्हा तिनं त्यांच स्वागत करण्यासाठी आपले हात पसरले तेव्हा ते घाबरून पळू लागले. मात्र सगळ्यांनी त्यांना अडवलं. पत्नीनं त्यांचा स्पर्श करताच ते तिच्यासारखेच तरुण, देखणे आणि सुदृढ झाले. सुदामा मोठ्यानं म्हणाले, 'हे कृष्णा, तू किती महान आहेस. मला कशाचीही अपेक्षा नव्हती. मात्र काल रात्री आपण झोपलो असताना तू मला किती ऐश्वर्य आणि संपत्ती दिलीस.' असं म्हणून ते रडू लागले. 'कृष्ण किती दयाळू आणि कृपाळू आहे. आपण विचार केला की थोडेफार धन देतील, त्यांनी काय दिलं याची आपण कल्पनाही करू शकत नाही.'

**कृष्ण भक्तांची काळजी घेतात**

आपण हे समजून घेतलं पाहिजे की कृष्ण अतिशय कृपाळू आहेत. तुम्ही त्यांच स्मरण केलं, त्यांच्या नावाचा जप केलात तर ते तुमच्या उदरनिर्वाहाची काळजी करतील. त्यामुळे घाबरू नका. तुम्ही नोकरी करत असाल तर एक हजार किंवा दहा हजार डॉलर वर्षाला दान करू शकता. मात्र कृष्णांची तुमच्यावर कृपा असेल तर तुम्ही न मागताही तुमच्याकडे हजारो, लाखो डॉलर येतील. कृष्ण तुम्हाला भरभरून देतील. तुमच्यावर अक्षरशः कृपावर्षाव करतील.